MUCLA Newsletter Bilingual
Maharashtra University And College Librarians Association
Regd. Under Trade Union Act.1926 Regd No:n.s.k./J-1835, Dt. 03/ 05/ 02014
Vol. 1, Issue No. 4 July - September - 2021

------------------------------------------------------------------

## Event Reports

------------------------------------------------------------------

### International Conference Organized by Chintamani College of Commerce, Pombhurna on Digitalization of Library

Chintamani College of Commerce in Pombhurna, Chandrapur in Collaboration with Chintamani Mahavidyalaya, Pombhurna organized One Day International Conference on 'Digitalization of Library' on 20th May, 2021.

Dr. Manish Kumar Bajpai, Librarian, Ram Manohar Lohia Central Law University, Lucknow; Dr. Dipak Kapade, In charge Librarian, Kavi Kulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek and Dr. Jayant Nandagaoli, Head , Dept. of Library & Information Science, HPT Arts and RKY Science College, Nashik were the Chief Resource Persons for the conference. The principal Dr. T. F. Gulhane and Dr. N. E. H. A. Pathan rendered all assistance and support to organize the above useful conference.

The online conference was attended by number of librarians and other professionals through Zoom platform and YouTube Channel. Prof. Dilip Virutkar, the Convener and Prof. Vijay Budhe, Co-convener have taken best efforts for organizing the conference. Prof. Satish Pise, Prof. Mangesh Jamdale and Prof. Nalini Joshi, the Librarians from the other colleges of Chintamani group of institutions took special efforts for organizing the above grant event.

### शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगांव येथे तीस दिवसीय राज्यस्तरीय व्यक्तिमत्व विकास प्रमाणपत्र कोर्स संपन्न

शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय बाभूळगांव येथे अर्थशास्त्र विभाग आणि ग्रंथालय व ज्ञान संसाधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तीस दिवसीय राज्यस्तरीय व्यक्तिमत्व विकास प्रमाणपत्र कोर्सचे आयोजन दि. १५ एप्रिल ते १५ में २०२१ दरम्यान आभासी पध्दतीने करण्यात आले होते. या कोर्सचा समारोपीय कार्यक्रम दि. १६ मे २०२१ रोजी संपन्न झाला. या सोहळ्याचे अध्यक्ष सन्माननीय प्रा. बाळासाहेब धांदे व्यवस्थापक, शिवशक्ती शिक्षण संस्था, कोठा हे होते तर विशेष अतिथी म्हणून डॉ. मोहन खेरडे, संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती तथा अध्यक्ष, महाराष्ट्र विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथपाल संगठना (MUCLA) हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. कविता तातेड अणे महिला महाविद्यालय यवतमाळ, डॉ. शशिकांत वानखेडे ग्रंथपाल, भारती महाविद्यालय आर्णी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉं दीपक कोदूरवार हे होते. याप्रसंगी मान्यवरांनी व्यक्तिमत्व विकास प्रमाणपत्र कोर्स कोरोनाच्या आपात्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांना नवचेतना, नवउमेद, नवसंकल्पना, नवाविचार देवून त्यांच्यामध्ये परिस्थितिशी सामना करण्याचे सामर्थ्य निश्चितच निर्माण करेल आणि परिपूर्ण व्यक्तिमत्व बनविण्याच्या दृष्टीने हा कोर्स अतिशय महत्वाची भूमिका बजावेल असे मत व्यक्त केले. या प्रसंगी कु. अंजलि गावंडे, कु. अनुश्री गोडे व आशिष साबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कोर्समध्ये एकूण ४३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यात यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, नागपूर, रामटेक व इतरही जिल्हयातील विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

या कोर्समध्ये व्यक्तिमत्व विकास अर्थ व गुणवैशिष्ट्ये, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात महाविद्यालयाची भूमिका, प्रभावी देहबोली, व्यक्तिमत्व विकासात खेळ व आध्यात्मिक मूल्यांचे योगदान, श्रवण कौशल्य, व्यक्तिमत्व विकासात माहिती व तंत्रज्ञानाची भूमिका, ताण तणाव व्यवस्थापन व्यक्तिमत्व विकासात आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचे महत्व, ध्येयनिश्चिती, संवाद कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, विविध जीवन कौशल्यांचा परिचय, वाचन संस्कार, SWOT Analysis, मुलाखात तंत्र व मंत्र, स्वतःला ओळखा, नेतृत्वगुण इ. विषयावर प्रा. डॉं. कविता तातेड, प्रा. डॉं स्वाती दामोदरे, प्रा. डॉ. ममता दयणे, डॉ. विकास टोणे, संचालक शारीरिक शिक्षण, प्रा. डॉ. संजय राचलवार, प्रा.

डॉ. माणिक ठिकरे, ग्रंथपाल डॉ. शशिकांत वानखेडे, प्रा. दिलीप खूपसे, प्रा.शितल राऊत, संचालक शारीरिक शिक्षण, प्रा. डॉ. नरेश महाजन, प्रा. डॉ. रंजना जीवने, प्रा. डॉ. आशा धारस्कर, प्रा. डॉ. निलेश सुलभेवार, प्रा. डॉ. चंद्रकांत सरदार, ग्रंथपाल डॉ. संजय शेणमारे, प्रा. अभिषेक काळमेघ, प्रा. डॉ. प्रतिभा काळमेघ, श्री कैवल्य पाटिल इ. तज्ञ मागदर्शकांनी वरील सर्व विषयांवर अभ्यासपूर्ण सादरीकरण व्हिडिओ द्वारे केले. याशिवाय शिवशक्ती महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी निखिल वाघ, मनोज बारसे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर लाईव्ह लेक्चर दिले व विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे व शंकाचे देखील त्यांनी निरसन केले.

सोबतच विद्यार्थ्यांना बोलते करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांसाठी विविध विषयावर गटचर्चा–प्रश्नमंजूषा अशा कार्यक्रमाचे आयोजन या कोर्स दरम्यान करण्यात आले. कोर्सच्या यशस्वीतेसाठी या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. प्रतिभा काळमेघ व ग्रंथपाल डॉ. संजय शेणमारे यांनी अथक परिश्रम केले.